झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

जा.क्र.मुंबई/झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/सन २००१/२५२
दिनांक :३० /०५/२००१

**परिपत्रक क्रमांक : -९९-**

# -: परिपत्रक :-

विषय : पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे सोडत (लॉटरी)पद्धतीने वितरण बाबत.

संदर्भ : प्राधिकरणाकडील सदनिकांचे लॉटरी पद्धतीने वितरण बाबत निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक क्रमांक ५५, ७१ व ८१

प्राधिकरणाकडून परिपत्रक क्रमांक ५५, ७१ व ८१ मध्ये पुनर्वसन इमारतीच्या सदनिकांची सोडत (लॉटरी) काढण्याबाबतची पद्धत विषद करण्यात आली आहे. तथापी निर्गमित करण्यात आलेल्या संदर्भिय परिपत्रकानूसार सोडत पद्धतीने सदनिकांचे वितरण करणेपूर्वी या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत तयार होणाऱ्या पुनर्वसनाचे इमारतीस वापराचा परवाना (Occupation Certificate) मिळण्यापूर्वी पुनर्वसित इमारतीच्या सदनिकांची सोडत (लॉटरी) काढतांना पुनर्वसन इमारतीचे बांधकाम काही प्रमाणात अपूर्ण राहण्याची शक्यता असल्याने काही समस्या निर्माण होत असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुनर्वसित इमारतीमध्ये लॉटरी पद्धतीने सदनिका वाटपाबाबतचा प्रस्ताव संस्था/विकासक यांचेकडून सहकार कक्षास प्राप्त झालेनंतर सहकार कक्षाने अभियांत्रिकी विभागास कक्षास कळवावे. अभियांत्रिकी विभागाकडे विकासकाकडून वापराचा परवाना (Occupation Certificate) साठी आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता झालेवर उपमुख्य अभियंता,झो.पु.प्रा. यांनी वापराचा परवाना (Occupation Certificate) निर्गमित करणेपूर्वी सहकार विभागास कळवावे. त्यानंतर पुनर्वसन इमारतीतील सदनिकांचे सोडतीने वाटपास सहकार कक्षाकडून परवानगी देण्यात यावी. पुनर्वसित इमारतीतील